आठवण !

‘बैजू’, ‘कालिदास’ अन् ‘गालिब’ साकारणारा सज्जन कलाकार : भारत भूषण

भारत भूषण हे नाव घेतलं की अर्थातच सर्व प्रथम स्मरतो ‘बैजू बावरा’ हा. नौशाद मियाँच्या सुरेल संगीताने नटलेला चित्रपट !

तू गंगा की मौज, मै यमुना किनारा
हो रहेगा मिलन

या शकील बदायुनीच्या पंक्ति आजही ‘त्या’ जमान्यात घेऊन जातात.

बचपन की मुहब्बत को
दिल से न भुला देना

या लताच्या स्वरातला आर्त उदासभाव अविस्मरणीय आहेच.

तसाच भक्ती संगीताची डूब अश्र अध्यात्माचा स्पर्श लाभलेला महंमद रफीचा सूर काळजाला हात घालतो. ‘मन तडपत हरी दर्शन को आज’ हे गीत पडद्यावर भारत भूषणने अशा उत्कटतेने सादर केलंय की अगदी रस्त्याने चालताना कुठूनही या गीताचे सूर कानी पडले की पावले थबकतात

झूले मे पवन से आई बहार
प्यार छलके


या झूल्यावरच्या प्रेमगीतामध्ये भारत भूषणने मीना कुमारी समवेत भावनांच्या हिंदोळ्यावर जणू झुलवत ठेवलं आपल्याला.

१९५० ते १९५२ या दोन वर्षाच्या काळात ‘प्रकाश पिक्चर्स’ च्या विजय भट्टनी ‘बैजू बावरा’ची निर्मिती केली अन् प्रेक्षकांनी हा चित्रपट अन् भारत भूषण - मीनाकुमारी ही जोडी उचलून धरली. पण त्याआधी भारत भूषणला चित्रपट सृष्टीत पावलं रोवण्यासाठी तीव्र संघर्ष करावा लागला.

१४ जून १९२१ हा त्याचा जन्मदिन. मेरठ येथे जन्मलेल्या भारत भूषणचे राष्ट्रपती राजेन्द्र प्रसाद यांच्याशी दूरचे नाते होते असं सांगतात. संगीताची गोडी असलेला भारत भूषण हार्मोनियम उत्तम वाजवायचा. चित्रपटांच्या ओढीने १९४० मधे तो कलकत्त्यात दाखल झाला. नंतर हिन्दी चित्रपट निर्मितीचे केन्द्र म्हणजे मुंबई, हे ओळखून तो १९४२ मधे मुंबईत आला. त्यासाठी घरातून एक हजार रुपये चोरुन तो निघाला. तापट वडिलांनी फिर्याद दाखल केल्यामुळे त्याला पोलिस चौकीत मारहाण संहन करावी लागली.

पुन्हा १९४२ मधे आपल्या काकीच्या मदतीने भारत भूषण घराबाहेर पडला. मुंबईत ‘भक्त कबीर’ या केदार शर्मा यांच्या चित्रपटात तो चमकला. १९४८ मधे पुन्हा केदार शर्मा यांनीच संधी दिल्यामुळे त्याच्या ‘सुहाग रात’ हा चित्रपट झळकला. नायिका होती, गीता बाली !

‘बैजू बावरा’ मधे तानसेनसारख्या दरबारी



गायकाशी झुंज देणारा ‘बैजू’ भारत भूषणने कमालीच्या आत्मियतेने रंगवला. तर त्याच्या बालपणची मैत्रिण मीनाकुमारीने सुंदर वठवली. याच काळात मीनाकुमारी अन् भारत भूषण यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले असं सांगतात. पण मीनाकुमारीच्या पिताजींनी त्याला विरोध दर्शवला. ‘बैजू बावरा’ त्याकाळी ‘सुपर हीट’ ठरला. उत्पन्नाचे अनेक विक्रम या चित्रपटाने मोडले.

१९५३ मधे आलेल्या ‘महाप्रभू चैतन्य’ या चित्रपटातल्या ‘चैतन्य’ या भूमिकेसाठी भारत भूषणने ‘फिल्म फेअर’चं अभिनयाचं पारितोषिक जिंकलं. इथून पुढे त्याने राजा, कवि, गायक अन् संगीतकार अशाच भूमिका रंगवत अपार लोकप्रियता हासिल केली हे त्याचं वेगळं वैशिष्ट्य !

ज्येष्ठ निर्माते -दिग्दर्शक सोहराब मोदी यांच्या ‘मिर्झा गालीब’ या चित्रपटात वाढवलेल्या दाढीमिशा, उंच दिवालाची टोपी या वेशभूषेत भारत भूषण तंतोतंत ‘गालिब’ भासला. शायरीचा अंदाज अन् प्रतिभेचा नजारा डोळ्यातून भाऊकपणे व्यक्त करत या राष्ट्रपती पदक विजेत्या चित्रपटात त्याने अप्रतिम अभिनयाची बुलंदी गाठली.

त्याचा पंचकोनी चेहरा, स्वप्नांत रमलेले नेत्र, दाट विपुल केस, मिटल्या ओठावरचे अव्यक्त भाव, शब्दात कधी आर्तता कधी मिठ्ठास यातून प्रेक्षक भराऊन जात. एकसूरी

१४ जून १९२१ हा भारत भूषणचा जन्मदिवस. त्यानिमित्त हा खास लेख खास ‘लोकमत’च्या वाचकांसाठी

बोलणं अन् निर्विकार थंड चेहरा हे त्याच्या बाह्य व्यक्तिमत्त्वातले दोष कवि आणि संगीतकार रंगवताना ‘प्लस पॉईंट’ ठरायचे !

मग ‘विश्वभारती’ या संस्थेद्वारे भारत भूषणने भागीदारीत चित्रनिर्मिती सुरू केली. रमेशचंद्र हा थोरला भाऊ अन् वेद अगरवाल यांच्यासह प्रथम त्याने ‘बसंत बहार’ हा चित्रपट दिला. शंकर-जयकिशनची राग-संगीतावर आधारित या चित्रातली सर्वच गाणी तुफान गाजली.

‘नैन मिले चैन कहाँ’, ‘जा जा रे बालमवाँ, ‘कर गया रे कर गया मुझ पे जादू’ या लताच्या गाण्यांनी कान तृप्त केले. तर मन्ना डेचं ‘सुर ना सजे क्या गाऊँ मै’ अन् रफीची ‘बडी देर भई’ अन् ‘दुनियाँ न भाये मोहे’ ही गाणी म्हणजे स्वरानंदाचा अद्‌भूत नजराणाच ठरला.

‘बरसात की रात’ हा १९६० मधे आलेला नितांत सुंदर चित्रपट ‘विश्वभारती’ ने सादर केलेलं स्वर्गीय स्वप्नचं ठरलं. संगीतकार रोशन जाणते दिग्दर्शक पी. एल. संतोषी यांचे पुनरागमन ’बरसात की रात’चं मोठं आकर्षण ठरलं.

भारत भूषण; मधुबाला यांची ही सुरेल प्रेमकथा, धडाक्यात रौप्यमहोत्सवापलीकडे झेपावली.

रोशन यांच्या अफाट संगीत प्रतिभेचा स्पर्श लाभलेला हा चित्रपट. कव्वाली हा या चित्रपटाचा प्राण ठरला.

‘ना तो कारवाँ की तलाश है’ या कव्वालीत मन्ना डे, अशा भोसले, सुधा मलहोत्रा, एस. डी. बातिश या प्रत्याकाचा आवाज असा काही खुललाय की प्रेक्षकांना स्वरांची अक्षरशः धुंदी चढली. ‘ये इश्क इश्क है’ या कव्वालीमधल्या सवाल-जवाबांच्या सुरेल जुगलबंदीचा नशा अजून उतरायला तयार नाहीय. त्या काळी, ह्या दोन्ही कव्वालीचा मजा लुटण्यासाठी एका दिवसात या ‘बरसात की रात’चे लागोपाठ खेळ पाहणारे रसिक मला आठवतात.

जिंदगीभर नही भूलेगी
बरसात की रात

या रफीने गायलेल्या गीताला भारत भूषणने पडद्यावर जे दृष्य काव्यात्म रुप दिलंय त्याची आठवण आजही अंगावर रोमांच उभे करते. भारत भूषणच्या एकूणच खडतर आयुष्यातलं ‘बरसात की रात’ हे एक सोनेरी पान म्हणायला हवं.

‘विद्यापती’, ‘संगीत सम्राट तानसेन’ असे काही चित्रपट भारत भूषणच्या नावावर जमा आहेत. ‘गेट वे ऑफ इंडिया’ आणि ‘फागुन’ या चित्रपटात भारत भूषण-मधुबाला ही जोडी दिसली. ‘दो घडी दिल के पास आ बैठे’ (गेट वे ऑफ इंडिया) आणि ‘इक परदेसी मेरा दिल ले गया’ (फागुन) ही लता-रफीची युगुलगीते आजही ताजी वाटतात.

१९५६ मधे भारत भूषणची प्रथम पत्नी गेल्यावर, अनुराधा अन् अपराजिता या लहान मुलींच्या देखभालीसाठी त्याने रत्ना या नटीबराबर विवाह केला. ‘बरसात की रात’मधे रत्ना होती. तशीच ‘कलंक शोभा’अन् ‘बायको माहेरी जाते’ या मराठी चित्रपटात रत्नाने सुरेख काम केलंय.

‘रानी रुपमती’ (निरुपा रॉय), ‘कवि कालिदार’ हे भारत भूषणचे स्मरणीय चित्रपट. देव आनंद (उद्धार), याक़ूब (हमारी शान) आणि प्रेम अदीब (भाई बहन) यांच्या समवेत त्याने काही भूमिका केल्या.

‘दूज का चाँद’ चित्रपटाच्या निर्मितीमध्ये मोठं अपयश आल्यावर भारत भूषण आर्थिक अडचणीत आला. ‘जहाँआरा’हा त्याचा नायक म्हणून जवळजवळ शेवटचा चित्रपट. अत्यंत सज्जन अन् मनमिळाऊ व्यक्तिमत्त्वाचा हा नट, सतत इतरांकडून फसवला गेला. तरी नंतर चरित्र अभिनेता म्हणून त्याने जवळपास दोनशे चित्रपटातून कामं केली.

‘प्यार का मौसम’ मधलं त्याच्या तोंडचं ‘तुम बिन जाऊ कहाँ’ हे रफीचं गाणं लोकप्रिय ठरलं. सुभाष घईच्या ‘हीरो’ मधला त्याचा बासरीवादक लक्षवेधी होता. दूरदर्शनच्या असंख्य मालिकांतूनही तो रमला.

२७ जानेवारी १९९२ रोजी भारत भूषणचे वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी निधन झाले. ‘बैजू बावरा’ अन् बरसात की रात’ हे त्याचे चित्रपट कधीच स्मृतीतून पुसले जाणार नाहीत.

- सदानंद गोखले